नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०३/२०२५ (मंगळवार) संध्याकाळ**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात उपविभाग नागपूर,सावनेर,उमरेड आणि काटोल अंतर्गत ( Safe Street ) रस्ते सुरक्षीत केलेबाबत

मा श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुर ग्रामीण जिल्हयात उपविभाग नागपूर,सावनेर,उमरेड आणि काटोल अंतर्गत ( Safe Street ) रस्ते सुरक्षीत करण्यात आले आहे.

**नागपूर उपविभागाअंतर्गत** बुटीबोरी शहरातील ईरा इंटरनॅशनल शाळा पासून कर्मन्येया मुला मुलींचे हॉस्टेल पर्यतचा रस्ता श्री. दीपक अग्रवाल (भा.पो.से.) सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग नागपूर यांणी पुढाकार घेवून सुरक्षीत केलेला आहे. सदर रस्त्यावर ईरा इंटरनॅशनल शाळा, दत्ता विद्या मंदीर, कर्मन्येया स्कुल अशा एकुण ०३ शाळा व कनिष्ठ महाविद्यालय असून याच रोडवर दत्ता मेघे रिक्रीएशन सेंटर, स्विमींग पुल, जिमखाणा व कर्मन्येया मुला मुलींचे हॉस्टेल आहे. तसेच सदर रस्त्यावर सायंकाळी व सकाळी परीसरात राहणारे महीला व पुरूष हे पायदळ चालने फिरणे करीत असतात. सदर रस्त्याने शालेय विद्यार्थीचे जाणे येणे सतत सुरू असते. सदर रस्त्याने अतिवेगाने वाहन चालविणारे वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे आदेश अधिनस्त वाहतूक पोलीस अंमलदारांना देवून मोटार वाहन कायद्यांन्वये कारवाई करीत आहे. सदर रस्त्यावर असलेले पानटपरी हटवून रस्त्याचे दोन्ही बाजूला ठिकठिकाणी बॅरीगेटींग करण्यात आले आहे. श्री. दीपक अग्रवाल (भा.पो.से.) सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग नागपूर यांणी स्वत: हजर राहून सदर रस्त्याने पायदळ चालने फिरणे करणारे जनसामाण्यांना काही अडचनी असल्यास ''डायल ११२'' प्रणाली बाबत माहीती देवून ११२ या टोल फ्रि क्रमांकावर फोन करणेबाबत सुचीत केले. सदर रस्त्याने वाहतूक पोलीसांकडून सतत पेट्रोलींग केली जात आहे.

**काटोल उपविभागाअंतर्गत** काटोल शहरातील बसस्थानक ते गळपुरा चौक पावेतो जवळपास १.५ कि.मी. अंतर आहे. सदर रस्त्यावर नागपुर ते वरूड, मोर्शी व नरखेड, सावनेर तसेच मध्यप्रदेशातील सौसंर, पांढुर्णा येथे मोठया प्रमाणात वाहनांची वर्दळ आहे. तसेच सदर रोडवर नगर परिषद शाळा क्रं २ व जिल्हा परिषद कन्या शाळा आहे. या व्यतिरीक्त बसस्थानकामुळे शाळा, कॉलेज, महाविदयालयातील विद्यार्थी, विदयार्थीनी पायदळ/सायकलने जाणे— येणे करित असतात. त्याचप्रमाणे बसस्थानकासमोर खाजगी

वाहने थांबत असल्यामुळे त्या ठिकाणी सतत नागरिंकांची वर्दळ असते. काटोल शहरातील आठवडी बाजार हा मंगळवारी व शुक्रवारी भरतो. सदर बाजारामध्ये परिसरातील नागरीक, व्यासायिक यांचा मोठया प्रमाणात वावर असतो. काटोल शहाराची मुख्य बाजारपेठ ही मुख्य रस्त्याचे लगतच आहे. सदर कारणामुळे नमुद रस्ता हा सुरक्षित रस्ता घोषीत केलेला आहे. सदर रस्त्यावर दररोज सकाळी १०.०० वा. ते १२.०० वा. पोवेतो व संध्याकाळी १८.०० वा ते २०.०० वा. पावेतो पोलीस पेट्रोलिंग नेमण्यात येणार आहे. सदर रस्त्याने अतिवेगाने वाहन चालविणारे वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे आदेश अधिनस्त वाहतूक पोलीस अंमलदारांना देवून मोटार वाहन कायद्यांन्वये कारवाई करीत आहे.

**उमरेड उपविभागाअंतर्गत** उमरेड शहरातील भिसीनाका चौक उमरेड ते बायपास चौक उमरेड रस्ता हा सुरक्षित रस्ता घोषीत केलेला आहे. सदर रस्त्यावर सतत पोलीस पेट्रोलिंग नेमण्यात येणार आहे. सदर रस्त्याने अतिवेगाने वाहन चालविणारे वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे आदेश अधिनस्त वाहतूक पोलीस अंमलदारांना देवून मोटार वाहन कायद्यांन्वये कारवाई करीत आहे.स्ट्रीट लाईट ची व्यवस्था, वाहन पार्कीग स्थळ, वेग मर्यादा, वाहतुकीचे नियम दर्शक फलक ,वाहतुकीवर पाळत ठेवण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुध्दा लावण्यात येणार आहे.

**सावनेर उपविभागाअंतर्गत** कळमेश्वर शहरातील तळयाची पार ते ब्राम्हणी फाटा आणि सावनरे शहरातील गांधी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक हे रस्ते सुरक्षित रस्ते घोषीत केलेले आहे. नमुद रस्त्यावरी पेट्रोलींग आणि नाकाबंदी सुरू करण्यात आली असुन नमुद रस्त्यावर दररोज सकाळी १०.०० वा. ते १२.०० वा. पोवेतो व संध्याकाळी १८.०० वा ते २०.०० वा. पावेतो पोलीस पेट्रोलिंग नेमण्यात येणार आहे. सदर रस्त्यावर रात्रीच्या वेळी डायल ११२ हे वाहन पेट्रोलींग करणार आहे.




नागपूर ग्रामीण पोलीस
नागपूर ग्रामीण


Shot on OnePlus
By Mamta Ahilya




Gold Loan


LIC
POLICE


इलेक्ट्रीक
PLASTO
CERA
श्री गजानन टाईल्स




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर